पारावरच्या गप्पा

# आयात-निर्यातीचं अन्याय्य धोरण शेतकऱ्यांना ठरतंय घातक



नित्यनियमाप्रमाणे देवदर्शन आटोपून गणपत पारावर येऊन बसला होता. चांगलीच थंडी पडत असल्यामुळे तो पारावर ऊन खात बसला होता. संपतही देवदर्शन घेऊन गणपतजवळ येऊन बसला. तो कधी आला हे गणपतला कळलेही नाही एवढा तो तंद्रीत होता! जेव्हा त्याच्या पाठीवर संपतचा हात पडला तेव्हा दचकून म्हणाला, ‘‘कधी आला रं संपा? कळलंच नाही मला!’’

संपत हसतच म्हणाला, ‘‘गंपा, तू कोणत्या गहन विचारांत आहे की तुला मी आलेलो देखील कळले नाही?’’

यावर हसत गणपत म्हणाला, ‘‘तसं काही नाही संपा. विचार करत होतो की यावर्षी कांदा भरपूर दिवस साठविला, पण सरकारने काही भाव वाढू दिले नाही. कांद्याचे भाव वाढले की आयात करायची; मग यावर्षी भाव कमी होते तर निर्यात का वाढविली नाही- किंवा निर्यातीला का प्रोत्साहन दिले नाही? मध्ये कापसाला भाव वाढायला लागले तर कापूस आयात केला. आजही शेतकऱ्यांकडे कापसाचा मोठा साठा उपलब्ध आहे. कापसाची निर्यात करून शेतकऱ्यांच्या खिशात दोन पैसे जास्त पडतील याचा विचार केला नाही. उलट कापूस आयात होतोय, हे बघून व्यापाऱ्यांनी कापसाचे भाव साडेनऊ हजार रुपयांवरून आठ हजार रुपयांपर्यंत पाडले. हीच अवस्था तुरीचीही होत आहे. तुरीचेही आयातीचे सौदे होत आहेत. तेलबिया, कडधान्ये याला चांगले भाव मिळाले तर कशाला करावी लागेल आयात? आता तर काय कापसाचे वायदे बाजार बंद केल्यामुळेही कापसाच्या भावाचा अंदाज येत नाही असे म्हणतात. मला तर संपा कळतच नाही, काय चाललंय सरकारचं! म्हणे पाच वर्षांत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार. येथे आहे त्याच उत्पन्नामध्ये घट येते. हे असं उफराटं गणित आणि विचार कसा कोण करतंय तेच नाही कळत संपा. याच विचारात होतो की, असंच चाललं तर आपलं पुढं कसं होणार? एक तर शेतीचा उत्पादन खर्च वाढत चाललाय. शेतीला मजूर मिळत नाहीत, मिळाले तर अव्वाच्या सव्वा पैसे मागतात. शेतीच्या लाईटबद्दल तर विचारुच नका. लाईट म्हणजे असून ताप- नसून पश्चाताप!

खताचे भाव वाढले आणि कंपन्याही लिंकिंग करतात. हवामानाचा तर अंदाजच येत नाही. एक दिवस ऊन, दुसऱ्या दिवशी धुकं, तिसऱ्या दिवशी पाऊस तर चौथ्या दिवशी थंडी. नेमकं आपण कोणत्या ऋतूत आणि कोणत्या देशात राहात आहोत तेच कळत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये पीक घेण्यासाठी खर्च वाढतो. आपल्याला त्रास होतो. उत्पादन काढल्यानंतर वाढलेल्या खर्चाचा कोणीही विचार करत नाही. ऊसाला मागील १० वर्षांपासून दोन ते अडीच हजार रुपये भाव तर कांदा १० ते १५ रुपये, गहू १८ ते २० रुपये, सोयाबीन ४ ते ५ हजार रुपये, हरभरा ३ ते ४ हजार रुपये, तूर ५ ते ६ हजार रुपये, कापूस ६ ते ७ हजार रुपये याप्रमाणे भाव मिळतो. एखाद्या वर्षी एखाद्या पिकाला चांगला भाव मिळाला तर सरकारच्या पायाखालची वाळू सरकते. मीडिया दिवसभर बोंब मारतो, घरातील अर्थशास्त्र बिघडते म्हणून महिलांच्या मुलाखती दाखवितात. इकडे दहा वर्षांत उत्पादन खर्च दुप्पट झाला आणि उत्पन्न मात्र आहे तिथेच. हीच परिस्थिती राहिली तर पुढे काय होणार याच विचारात होतो बघ संपा.''

संपतही गणपतच्या बोलण्यात तल्लीन झाला होता. शेवटी तोही एक शेतकरीच होता. गणपत सांगत होता त्या सर्व बाबी एकदम बरोबर होत्या. त्यामुळे तो बोलत असताना आज संपतने त्याला एकदाही मध्ये थांबविले नाही. थोडा वेळ शांतता पसरली. मग संपतनेच सुरुवात केली.

तो म्हणाला, ''गंपा तू म्हणतो ते अगदी शंभर टक्के बरोबर आहे. आज लहान शेतकरी असो की मोठा- सर्वांची तीच परिस्थिती आहे. ज्याच्याकडे शेती सोडून नोकरी किंवा इतर व्यवसायांतून पैसा येतो त्याचा प्रपंच चांगला सुरू आहे. फक्त शेतीवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबांची परिस्थिती चांगली नाही. जर बागायती भागामध्ये ही परिस्थिती आहे तर जिरायत भागातील शेतकऱ्यांची परिस्थिती आणखीनच वाईट आहे. याला सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे शेतमाल उत्पादन आणि त्याचा भाव यावर कधीही गांभीर्याने विचार झालेला नाही. शेतीमध्ये पिकविलेल्या शेतमालाचा दर चुकीच्या पद्धतीने ठरविला जातो. प्रत्येक राज्याचे उत्पादन आणि उत्पादन खर्च वेगवेगळा असतो. तरीही भाव कमीतकमी ठरविला जातो. बरं ठरविलेल्या भावाने खरेदी केली जात नाही. दरवर्षी उत्पादन खर्चात किती वाढ होते त्यानुसार आधारभूत किंमतीमध्ये वाढ होणे गरजेचे असते. परंतु उत्पादन खर्चात १० ते १५ टक्के वाढ होत असताना आधारभूत किंमतीमध्ये ४ ते ५ टक्केच वाढ होते. त्यामुळे उत्पादन खर्च आणि आधारभूत किंमत यामध्ये दरवर्षी तफावत वाढून शेती तोट्यात येऊ लागते. हे मागील ६०-७० वर्षांपासून सुरूच आहे. मग एखाद्या पिकाचे उत्पादन घटले किंवा भाव आधारभूत किंमतीच्या वर जायला लागले की सरकारी अधिकारी लगेच कामाला लागतात. आयातीसाठी झटपट निर्णय होतात. आयात होणार ही बातमी बाहेर यायचा अवकाश की जो शेतमाल देशात कमी; त्याची मोठी गरज आहे हे माहिती असूनही व्यापारी बाजारभाव कोसळवतात. शेतकरीही घाबरून शेतमाल विकायची घाई करतो. हे सर्व धोरण पद्धतशीरपणे राबविले जाते. कारण या लिंकमधील प्रत्येकाचा फायदा होत असतो. मरतो तो मात्र उत्पादक शेतकरी. म्हणजेच शेतमालाच्या उत्पादनावर आडाखे बांधणारे सारे तुपाशी राहतात आणि आपला उत्पादक शेतकरी मात्र उपाशी! एखाद्या पिकाचे उत्पादन वाढले तर त्याच्या निर्यातीबाबत निर्णय घ्यायला काही दिवस नाही तर महिने लागतात. रास्ता रोको करावा लागतो, आमदार- खासदारांना भेटावे लागते. शेतमाल रस्त्यावर विकावा, वेळप्रसंगी फेकावाही लागतो! यात अनेक महिने जातात. तोपर्यंत हा शेतमाल शेतकऱ्यांकडून अनेक व्यापाऱ्यांच्या ताब्यात गेलेला असतो. नंतर शासनाला जाग येते. मग निर्यातीला परवानगी मिळते. निर्यातीला अनुदान- प्रोत्साहन दिले जाते. हे सर्व रामायण- महाभारत होईपर्यंत शेतकऱ्याच्या ताब्यातील बराचसा शेतमाल संपलेला असतो. अशा वेळी शेतकरी उपाशी आणि इतर मात्र तुपाशी असतात. हे रहाटगाडगं मागील अनेक दशकांपासून सुरू आहे. शेतमालाचे आयात-

निर्यात धोरण नेमके कोणासाठी राबविले जाते हे आजपर्यंत कळले नाही. यातून नाही कधी शेतकऱ्यांचा फायदा झाला आणि नाही कधी ग्राहकांचा. त्यामुळे कधी कधी मला वाटतं 'आलिया भोगासी असावे सादर' या म्हणीप्रमाणे शांत राहावे.''

सहसा संपत कधी कोणत्याही विषयावर बोलताना असा उदास होऊन माघार घेत नाही. परंतु आज मात्र या विषयावर त्यानेही माघार घेतल्याचे बघून गणपतला विशेष वाटले. अचंबित होऊन तो म्हणाला, ''कारं संपा, तूच असं म्हणायला लागल्यावर माझ्या तर पायातले त्राणच गेले बघ. यातून काहीच मार्ग निघू शकत नाही काय? हे असंच चालू राहिलं तर मग आपल्याला शेती विकून जावं लागेल शहराकडे!''

यावर संपत हसला. तो म्हणाला, ''साऱ्यांनीच शेती विकून शहरात गेल्यावर अन्नधान्ये पिकवणार कोण? खायला अन्न कोठून मिळणार? ठीक आहे सध्या शेती आणि शेतकऱ्यांना वाईट दिवस सुरू आहेत; परंतु प्रत्येकाचा एक दिवस असतोच! शेती आणि शेतकऱ्यांचाही एक दिवस नक्कीच येणार आहे. शेतीच्या उत्पादनाचा भाव, उत्पादन खर्च आणि शेतीमधील एकूण उत्पन्न याचा विचार सरकारला एक ना एक दिवस करावाच लागणार आहे. आयात- निर्यात धोरण हे अचानक न बदलता त्यामध्ये दीर्घकालीन बदल करण्यासाठी प्रयत्न करावेच लागतील. आयात- निर्यातीच्या दीर्घकालीन धोरणानुसार पीक उत्पादनाचे नियोजन करावेच लागेल. कोणत्या शेतमालाला देशांतर्गत मागणी, निर्यातीला वाव किंवा आयातीची संधी आहे याचा सर्व विचार सरकारला करावा लागेल. त्यानुसार कोणत्या पिकाला जास्त प्रोत्साहन द्यायचे आणि कोणत्या पिकाखाली कमी क्षेत्र ठेवायचे याबद्दलचं धोरण- निर्णय ठरवूनच त्यानुसार कृती कार्यक्रम करण्यासाठी सरकारला प्रयत्न करावे लागतील. कारण पुढील काळ हा फार वेगळा असणार आहे. एकीकडे शेती उत्पादनात घट तर लोकसंख्येत वाढ होत आहे. शेती उत्पादनावर परिणाम करणाऱ्या हवामानातही प्रतिकूल बदल होत आहेत. भविष्यात अन्नधान्याचा तुटवडा हा जागतिक प्रश्न असेल. गंपा, म्हणूनच म्हणतो- आजचा दिवस आपला नसला तरी उद्याचा दिवस आपलाच आहे. आता 'फक्त लढ' अशी वेळ आपल्यावर आहे. म्हणून आपण लढायचं- रडायचं नाही. कारण उद्या आपल्या शेतीतून चांगले उत्पन्न काढून समाजाला खाऊ घालायचं आहे आणि अन्नदाता म्हणून मिरवायचं आहे. चल नको विचार करू बघ. चांगला स्पेशल चहा पाजतो तुला!''

**(सौजन्य: पूर्वा कृषिदूत परिवार)**

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**